GONDIA EDUCATION SOCIETY'S
SETH NARSINGDAS MOR ARTS, COMMERCE &
SMT. GODAVARIDEVI SARAF SCIENCE COLLEGE,
TUMSAR. 441 912. (M.S.) DISTT. : BHANDARA.

Ph. No. : (07183) Off. 233300 Res. (07183) 233301 Fax (07183) 233301
E-mail - principalsnmorcollege@rediffmail.com

Ref. No. : .............................. Date : .....................

# अमृत महोत्सवानिमित्त वर्षभर महाविद्यालयात घेण्यात आलेल्या कार्यक्रमाचा अहवाल

## रक्तदान शिबिर

दिनांक २०/१०/२०२१ रोजी महाविद्यालयात एन.एस.एस. विभागातर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक आणि एन.एस.एस. च्या १५ विद्यार्थ्यांनी रक्तदान केले.




## स्वच्छता अभियान

दिनांक २१.१०.२०२१ रोजी स. ११:०० वाजता ‘आजादी के ७५ साल’ अमृत महोत्सवानिमित्त महाविद्यालय परिसर आणि शहरातील हुतात्मा परिसर येथे स्वच्छता अभियान राबवून ३० किलो प्लास्टिक गोळा करून त्याचे निर्मूलन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. बी. मसराम यांनी विद्यार्थ्यांना एन.एस.एस. विद्यार्थ्यांचे स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले. या कार्यक्रमासाठी एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी प्रा. लक्ष्मण पेटकुले व एन.एस.एस. च्या ३२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.











## ‘सायबर गुन्हेगारी’ या विषयावर मार्गदर्शन कार्यक्रम

दिनांक १७.११.२०२१ रोजी महाविद्यालयातील एन.एस.एस. विभाग आणि राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमान महाविद्यालयात ‘सायबर गुन्हेगारी’ या विषयावर मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आले. या प्रसंगी तुमसर नगरीचे PI श्री नितीन चिंचोळकर यांनी सायबर गुन्हेगारी या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

केले. तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. बी. मसराम अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी प्रा. लक्ष्मण पेटकुले यांनी केले तर उपस्थितांचे आभार डॉ. वेरुळकर यांनी मानले. यावेळी ४६ विद्यार्थी कार्यक्रमासाठी उपस्थित होते.




## <u>वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन</u>


दिनांक २३.११.२०२१ रोजी महाविद्यालयातील एन.एस.एस. विभाग आणि नेहरू युवा केंद्र (खेल मंत्रालय, भारत सरकार) यांच्या संयुक्त विद्यमाने "सबका साथ, सबका विकास और सबका प्रयास" विषयावर तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यावेळी नेहरू युवा केंद्राच्या कोअर प्रतिनिधी कु. जयश्री बिसने व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. बी. मसराम अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. या स्पर्धेत सात विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला त्यापैकी विधी वर्षा प्रथम, पानेरी निखाडे द्वितीय तर स्थान रेणुका पासवान या विद्यार्थिनीने पटकाविला. या कार्यक्रमात ५० विद्यार्थी, विद्यार्थिनी व महाविद्यालयाचे प्राध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.

एल. के. पेटकुले यांनी केले. तर आभार राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. आर. ओ. बेलोकार यांनी मानले.




## संविधान दिवस


दिनांक २६.११.२०२१ रोजी महाविद्यालयाचे विभाग एन.एस.एस. विभाग आणि राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमान २६.११.२०२१ म्हणजेच संविधान दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला इंग्रजी विभागप्रमुख डॉ. राधेश्याम दिपटे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. बी. मसराम यांनी संविधानाचे महत्त्व पटवून दिले व उपस्थित विद्यार्थ्यांसमोर संविधानाच्या प्रस्तावनेचे सामूहिक वाचन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाला ५२ विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.



## मतदार दिवस


एस. एन. मोर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना आणि राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २५/१०/२०२२ ला ‘राष्ट्रीय मतदार दिवस’ साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सी. बी. मसराम होते तर प्रमुख पाहुणे आणि वक्ते म्हणून प्रा. किशोर नेताम, नागपूर होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. सी. बी. मसराम म्हणाले कि, स्वस्त लोकशाही निर्माण करायची असेल तर मतदारांमध्ये जनजागृती होणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन केले. तर प्रा. किशोर नेताम आपल्या अतिथी भाषणात म्हणाले की, “भारतीय नागरिकांना आपल्या कर्तव्याची जाणीव करून देणारा दिवस म्हणजे ‘राष्ट्रीय मतदार दिवस’ होय.”

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. लक्ष्मण पेटकुले यांनी केले तर आभार राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. राजेंद्र बेलोकार यांनी मानले या ऑनलाईन कार्यक्रमात महाविद्यालयाचे १५० विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मतदारांना प्रतिज्ञा



# <u>७५ कोटी सूर्य नमस्कार कार्यक्रम</u>

दि. ०९.०२.२०२२ रोजी महाविद्यालयातील एन.एस.एस. विभागातर्फे देशाच्या अमृत महोत्सव प्रसंगी भारत सरकारच्या निर्देशानुसार ७५ कोटी सूर्यनमस्कार या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ८:०० वाजता करण्यात आली. या कार्यक्रमात शारीरिक शिक्षण विभागाचे डायरेक्टर डॉ. संजय आगाशे व डॉ. संतोष चौधरी यांनी उपस्थित प्राध्यापक, प्राध्यापिका आणि विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून सूर्यनमस्कार करून घेतले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. बी. मसराम सर उपस्थित राहून सहकार्य केले व आरोग्याचे महत्त्व पटवून दिले. या कार्यक्रमाला २०० विद्यार्थी व प्राध्यापक सहभागी झाले होते.



## जागतिक महिला दिवस

दिनांक ८ मार्च २०२२ रोजी महाविद्यालयातील एन.एस.एस. विभाग आणि महिला सेल यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. अरुणा बावनकर ह्या उपस्थित होत्या तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. बी. मसराम उपस्थित होते. यावेळी 'नारी शक्ती' या विषयावर मान्यवरांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी महाविद्यालयाचे डॉ. के. के. लेंडे, डॉ. भारती काटेखाये, डॉ. आरती साळवे, डॉ. सुनीता राठोड आदी प्राध्यापिकांचे पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी एन.एस.एस. चे कार्यक्रम अधिकारी प्रा. लक्ष्मण पेटकुले व स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले. यावेळी 70 विद्यार्थी कार्यक्रमाला उपस्थित होते.





## एन. एस. एस. विशेष शिबिर २०२२

माननीय प्राचार्य डॉ. सी. बी. मसराम यांच्या नेतृत्वामध्ये दिनांक १९/०३/२०२२ ते २५/०३/२०२२ या कालावधीत एस. एन. मोर महाविद्यालयातील एन. एस. एस. युनिट तर्फे

मौजे हसारा, ता. तुमसर, जि. भंडारा या गावी विशेष सात दिवसीय शिबिराचे आयोजन करण्यात आले. १९, २० मार्च २०२२ या दोन दिवशी महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांमार्फत शिबिराची उभारणी करण्यात आली.

दिनांक २१/०३/२०२२ रोजी शिबिराचे उद्घाटन माननीय IQAC चे समन्वयक डॉ. राधेश्याम दिपटे यांच्या हस्ते करण्यात आले. या उदघाटकीय कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. ए. आर. रामटेके उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक एन. एस. एस. कार्यक्रम अधिकारी प्रा. लक्ष्मण पेटकुले यांनी केले. तर आभार एन. एस. एस. ची स्वयंसेविका कु. रेणुका पासवान हिने मानले.



दिनांक २२/०३/२०२२ रोजी हसारा या गावी एन. एस. एस. विद्यार्थ्यांचे सकाळी ७:०० वाजता प्रभात फेरी काढून गावक-यांना स्वच्छता, अंधश्रद्धा, साक्षरता, पाणी आडवा पाणी जिरवा सारख्या विषयांवर घोषवाक्य देऊन जनजागृती करण्यात आली. दुपारी १२:०० वाजता बौद्धिक सत्रामध्ये प्रा. डॉ. मस्के यांचे ‘एन. एस. एस. आणि युवा शक्ति’ या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. लक्ष्मण पेटकुले होते तर आभार एन. एस. एस. स्वयंसेवक निखील किरणापुरे यांनी मानले.

सायंकाळी ७:३० वाजता एन. एस. एस. च्या विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले व या कार्यक्रमात गावक-यांनी ही उस्फूर्त प्रतिसाद दिला.
















दिनांक २३/०३/२०२२ रोजी सकाळी ०८:०० ते १०:०० वाजतापर्यंत गावांमध्ये स्वच्छता अभियान घेण्यात आले. यामध्ये गावातील रस्ते, नाली व प्लास्टिक वेचून त्याचे निर्मूलन करण्यात आले. दुपारी १२:०० वाजता बौद्धिक सत्रामध्ये शारदा कनिष्ठ महाविद्यालय, तुमसर येथील व अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे तालुका अध्यक्ष प्रा. राहुल डोंगरे यांनी ‘अंधश्रद्धा निर्मूलन’ या विषयावर प्रात्यक्षिकच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष एस. एन. मोर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. बी. मसराम सर उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तर आभार एन. एस. एस. कार्यक्रम अधिकारी प्रा. लक्ष्मण पेटकुले यांनी मानले.

संध्याकाळी ०७:३० वाजता एन. एस. एस. स्वयंसेवकांतर्फे सांस्कृतिक कार्यक्रमात गीत, गायन, नृत्य व अंधश्रद्धेवर आधारित नाटिका सादर करण्यात आली.

लोकमत

राहुल डोंगरे : हसारा येथे राष्ट्रीय सेवा योजना शिबिर

# विद्यार्थ्यांनो, चिकित्सा करा व बुद्धीप्रामाण्यवादी व्हा

लोकमत न्यूज नेटवर्क

**तुमसर** : जादूटोणा, भूत-भानामती, करणी, मंत्रतंत्र, चेटूक, चमत्कार, देवी अंगात येणे, जोतिष्य, बुवाबाजी या केवळ अंधश्रद्धा आहेत. आम्ही सारे वैज्ञानिक युगात जगतो, विज्ञान वापरतो, तसेच वैज्ञानिक शोधामुळे आपले जीवन सुखमय करून घेतो; पण विज्ञानाचा मूलभूत आधार असणारा वैज्ञानिक दृष्टिकोन मात्र स्वीकारत नाही. या प्रकारांना अशिक्षिताप्रमाणे सुशिक्षितही नेहमी बळी पडत असतात. यासाठी विद्यार्थ्यांनो चिकित्सा करा व बुद्धिप्रामाण्यवादी व्हा, अंधश्रद्धेचे निर्मूलन सहजतेने होईल, असे प्रतिपादन अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समिती तुमसर तालुका संघटक राहुल डोंगरे यांनी केले.

तुमसर तालुक्यातील हसारा येथील जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळेच्या पटांगणावर एस.एन. मोर कॉलेज, तुमसरद्वारा आयोजित राष्ट्रीय सेवा योजना शिबिरात अंधश्रद्धा निमूर्लन या कार्यक्रमात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. चेतनकुमार मसराम होते. कार्यक्रम अधिकारी म्हणून डॉ. प्रा. राहुल भगत, डॉ. प्रा. बावनकर, डॉ. प्रा. अरुण चव्हाण, प्रा. लक्ष्मण पेटकुले मंचावर उपस्थित होते.

यावेळी प्राचार्य चेतनकुमार मसराम म्हणाले, अशा शिबिरातून विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास होतो. त्यांच्या अंगी असलेल्या कौशल्याचा विकास होतो. नेतृत्व क्षमता विकसित होऊन विद्यार्थी आयुष्यात कधीच खचत नाही. विद्यार्थ्यांनी यश संपादन करण्यासाठी विचाराला कृतीची साथ द्यावी व महापुरुषांचा आदर्श जोपासावा, असा हितोपदेश केला.

संचालन सतीश रंगारी यांनी केले. आभार काजल जैतवार हिने मानले. संघराज डोंगरे यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात आले. यावेळी समितीच्या पदाधिकाऱ्यांनी अंधश्रद्धेला बळी न पडता विज्ञानवादी बना असे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांसह अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या सदस्यांनी सहकार्य केले.




मार्गदर्शन करताना राहुल डोंगरे, उपस्थित डॉ.चेतनकुमार मसराम, डॉ.राहुल भगत.

## विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगावा

शकुन, नवस, गंडेदोरे, ताईत, ग्रहांचे खडे, मंत्रबळ यांना सत्याचा आधार नाही. ग्रह हे मानवाची नियती ठरवत नाहीत म्हणून ज्योतिष, हस्तरेखाशास्त्र हे विज्ञान नाही. अंधश्रद्धा ही आधुनिक समाजाला लागलेली कीड आहे. तिचे निर्मूलन कसे करता येईल. याकरिता राहुल डोंगरे यांनी तंत्र सामर्थ्याने अग्नी प्रज्वलित केला. कानाने चिठ्ठीवरील नावे वाचून दाखविली, जळता कापूर भक्षण करून दाखवला, पेचकसने तांदूळ भरलेला तांब्याचा गडवा वर उचलून दाखविला. वैज्ञानिक प्रयोगातून विद्यार्थी मंत्रमुग्ध झाले. पुरोगामी विचार स्वीकारून विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन जागृत करावा, भोंदूबाबांना बळी पडू नये. गावागावांत शांतता व सुव्यवस्था राहावी, याकरिता प्रत्येक विद्यार्थ्यांनी अंधश्रद्धा निर्मूलनाचा संकल्प करावा व भारताला महासत्त बनविण्यासाठी खारीचा वाटा उचलावा, असा हितोपदेश विद्यार्थ्यांना केला.

Hello Bhandara
Page No. 4 Mar 29, 2022
Powered by: erelego.com












दिनांक २४/०३/२०२२ रोजी सकाळी ८:०० वाजता हसारा या गावाला लागून असणा-या तलावाचे स्वच्छतेचे कार्य हाती घेण्यात आले. तलावा किना-यावर प्लास्टिक-पतारवाळी कपडे दारूच्या बाटल्या आदींमुळे घाणीचे साम्राज्य पसरले असता एन. एस. एस. च्या स्वयंसेवकांनी ही सर्व घान एकत्र करून त्याचे निर्मुलन करून तलावाचे परिसर स्वच्छ करण्यात आले.








दुपारी १२:०० वाजता बौद्धिक सत्रामध्ये महाविद्यालयाचे मराठी विभागप्रमुख प्रा. रेणुकादास उबाळे यांचे 'मराठी संस्कृति' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. यावेळी सत्राचे अध्यक्ष प्रा. अमोल खांदवे उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार स्वयंसेवक विधी वर्मा हिने मानले. संध्याकाळी ७:३० वाजता सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये गायन, नृत्य व नाटकाचे आयोजन करण्यात आले.




दिनांक २५/०३/२०२२ रोजी सकाळी ७:३० वाजता जिल्हा परिषद शाळा परिसराची स्वच्छता करण्यात आली. दुपारी १२:०० वाजता शिबिराचे समारोपीय कार्यक्रम घेण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली. या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. राहुल भगत होते व हसारा या गावची प्रथम नागरिक सरपंच चंद्रकला भगत या उपस्थित होत्या. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. एम. एफ. जाधव उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. लक्ष्मण पेटकुले यांनी केले तर आभार पानीनी निखाडे या विद्यार्थिनीने मानले व राष्ट्रगीताने शिबिराचे समापन करण्यात आले.









या सात दिवसीय शिबिरात एन. एस. एस. चे ७५ स्वयंसेवकांनी सहभाग घेतला व महाविद्यालयाचे प्राध्यापक, प्राध्यापिका व शिक्षकेत्तर कर्मचा-यांनी वेळोवेळी शिबिरास भेट देऊन विद्यार्थ्यांचे मनोबल वाढविले. या शिबिरासाठी एन. एस. एस. चे कार्यक्रम अधिकारी प्रा. लक्ष्मण पेटकुले यांनी परिश्रम घेतले.

एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी
एस. एन. मोर महाविद्यालय, तुमसर